**आरबीआय/२०११-१२/२९९**
डीजीबीए.सीसीडी. क्र. एच- ३७६४ /१५.०२.००१/२०११-१२ डिसेंबर १५, २०११

अध्यक्ष आणि कार्यकारी संचालक/कार्यकारी संचालक सरकारी खाते विभाग /मुख्य कार्यालय
स्टेट बँक ऑफ इंडिया/स्टेट बँक ऑफ पटियाला/
स्टेट बँक ऑफ बिकानेर ऍन्ड जयपूर /स्टेट बँक ऑफ त्रावणकोर / स्टेट बँक ऑफ हैदराबाद/स्टेट बँक ऑफ म्हैसूर/आंध्रा बँक/
अलाहबाद बँक/बँक ऑफ बरोडा/बँक ऑफ इंडिया/
बँक ऑफ महाराष्ट्र/कॅनरा बँक/सेंट्रल बँक ऑफ इंडिया/
कोर्पोरेशन बँक/देना बँक /इंडियन बँक/इंडियन ओव्हरसिज बँक / पंजाब नॅशनल बँक/सिंडिकेट बँक/युको बँक /
युनियन बँक ऑफ इंडिया/युनायटेड बँक ऑफ इंडिया/विजया बँक/आयडीबीआय बँक लि. /आयसीआयसीआय बँक लिमिटेड

महोदय/महोदया,

**सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी योजना १९६८ (पीपीएफ १९६८) आणि ज्येष्ठ नागरिक बचत योजना, २००४ (एससीएसएस २००४) मधील दुरुस्ती - एजंटांना दलाली देणे.**

वरील विषयावरील भारत सरकारची अधिसूचना क्र. एफ. १/१२/२०११ - एनएस-२ दि. नोव्हेंबर २५, २०११ ची प्रत सोबत पाठवीत आहोत. त्यामधील मजकूर स्पष्ट आहे.

२. ह्याबाबत सांगण्यात येते की, ह्या अधिसूचनेमधील मजकूर, पीपीएफ १९६८ व एससीएसएस २००४ योजनेची कार्यवाही करणाऱ्या आपल्या बँकेच्या शाखांच्या नजरेस आणावा. हा मजकूर, पीपीएफ १९६८ व एससीएसएस २००४ चे वर्गणीदार व एजंट ह्यांच्या माहितीसाठी आपल्या शाखांच्या सूचना फलकांवरही प्रदर्शित करावा. डिलिट

आपला

(श्रीकांत हमिने)
व्यवस्थापक
सहः एक


सरकारी विभाग आणि बँक खाते, सेंट्रल कार्यालय, भायखळा कार्यालय बिल्डिंग, ४ था मजला, मुंबई सेंट्रल रे;वे स्टेशन समोर, भायखळा, मुंबई - ४०००००८, टेलिफोन : (०२२) २३०८४१२१, फॅक्स :(०२२) २३०१००९५/२३०००३७०, ई-मेलः cgmicdgbaco@rbi.org.in

**[भारतसरकारच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यासाठी-असाधारण, भाग-१, विभाग १]**

नवी दिल्ली २५ नोव्हेंबर २०११

**वित्तमंत्रालय**
**(आर्थिक कृती विभाग)**

**अधिसूचना**

क्र.एफ. १/१२/२०११ -एनएस-२-भारत सरकार येथे अधिसूचित करत आहे की, स्टँडर्ड एजन्सी सिस्टम (एसएएस) आणि महिलाप्रधान क्षेत्रीय बचत योजना (एमपीकेबीवाय) खाली एजंटांनी केलेल्या करारनाम्याच्या अटीनुसार ह्या योजनांचा प्रचार करण्यासाठी/लघु बचत योजनांमध्ये गुंतवणुक करण्यासाठी प्राधिकृत एजंटांना खाली दिलेल्या दराने दलाली दिली जाईलः

(अ) महिलाप्रधान क्षेत्रीय बचत योजना (एमपीकेबीवाय)

| | | | **दर** |
|---|---|---|---|
| (i) | पाच वर्ष आवर्ती ठेव खाते | - | ४% |

(ब) स्टँडर्डाईज्ड एजन्सी सिस्टिम (एसएएस)

| | | | |
|---|---|---|---|
| (i) | एक-वर्ष कालावधी ठेव | - | ०.५% |
| (ii) | दोन-वर्ष आणि ३-वर्ष कालावधी ठेवी | - | ०.५% |
| (iii) | पाच-वर्ष कालावधी ठेवी | - | ०.५% |
| (iv) | मासिक आय खाते योजना | - | ०.५% |
| (v) | पाच/सहा-वर्ष नॅशनल सेविंग सर्टिफिकेट (VIII -इश्यु) | | ०.५% |
| (vi) | दहा-वर्ष नॅशनल सेविंग सर्टिफिकेट(IX-इश्यु) | - | ०.५% |

२. सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी योजना (१ %) व ज्येष्ठ नागरिक योजना (०.५ %) ह्यावरील दलालीने प्रदान बंद करण्यात आले आहे.

३. राज्य/केंद्र शासित प्रदेश सरकारांनी दिलेले प्रलोभन/प्रोत्साहन, केंद्र सरकारने दिलेले दलालीमधून कापण्यात येईल.

४. ह्या सूचना १ डिसेंबर २०११ पासून जारी होतील.

सही/-

**एम.ए.खान, दुय्यम सचिव**